[वेळ: ३ तास] [ गुण: १०० ]

कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र.१ अ. ‘साहित्य’ ही संकल्पना स्पष्ट करून ‘साहित्य आणि समाज’ यांचा परस्परसंबंध सविस्तर स्पष्ट करा. २०

किंवा

ब. स्त्रीवाद म्हणजे काय ते सांगून स्त्रीवादाचे स्वरूप आणि विशेष स्पष्ट करा.

प्र.२ अ. महानगरीय साहित्याचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा. २०

किंवा

ब. ‘क्रमशः’ या कादंबरीचे वाङ्मयीन महत्त्व अधोरेखित करा.

प्र.३ अ. मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना सांगून ग्रामीण साहित्याचे महत्त्व विशद करा. २०

किंवा

ब. ‘धग असतेच आसपास’ या काव्यसंग्रहातून १९९० नंतरच्या ग्रामीणतेचा बदलता चेहरा कसा साकार होतो, ते स्पष्ट करा.

प्र.४ **टिपा लिहा. (कोणत्याही तीन )** ३०

१. संस्कृती : संकल्पना व स्वरूप
२. मार्क्सचा ‘पाया व इमला’ सिद्धांत
३. ’क्रमश:’ मधील मुंबई शहर
४.‘धग असतेच आसपास’ मधील समाज वास्तव

प्र.५ **एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दहा )** १०

१. मराठी समीक्षेत लालजी पेंडसे यांनी कोणत्या समीक्षेला ओळख प्राप्त करून दिली?

२. “The best word in best order” ही साहित्याची व्याख्या कोणत्या अभ्यासकाने केली आहे ?

३. मानवी संस्कृतीची दोन अंगे कोणती?

४. समाजाची चार लक्षणे कोणत्या समाजशास्त्रज्ञाने सांगितली आहेत?

५. ‘डिक्लेरेशन ऑफ द राईटस ऑफ विमेन ॲण्ड द फिमेल सिटीझन’ हा ग्रंथ कोणत्या फ्रेंच नाटककाराचा आहे?



XROYADMINYB12DD3XROYADMINYB12DD3XROYADMINYB12DD3XROYADMINYB12DD3

६. महानगरीय जीवनाचे चित्रण प्रथम कोणाच्या कवितेतून आले आहे?

७. "मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे", "तू ही इयत्ता कंची", "या सत्तेत जीव रमत नाही" हे कवितासंग्रह कोणाचे आहेत?

८. 'क्रमशः' कादंबरीतील कोणती व्यक्तिरेखा मंत्रालयात घोडा घेऊन जाते?

९. "ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य होय." ही ग्रामीण साहित्याची व्याख्या कोणी केली आहे?

१०. कोणत्या कवितेत 'संपलेल्या आईची गोष्ट' हेलावून टाकते?

११. क्रमशः' या कादंबरीतील लेखकाचा मित्र कोणते वार्तापत्र चालवत असतो?

१२. महानगरी जीवनातील गिरणी कामगारांचे भावविश्व कवी रेखाटतो?

---



XROYADMINYB12DD3XROYADMINYB12DD3XROYADMINYB12DD3XROYADMINYB12DD3